# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २२/०८/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील चिरव्हा येथे फिर्यादी नामे– राहुल सुरेश पवार, वय ३० वर्ष, रा. चिरव्हा ता. मौदा जि. नागपुर हे नेहमी प्रमाणे बकऱ्या चारायला घेवुन गेले व सायंकाळी ०५.०० वा. बकऱ्या घेवुन घराचे समोर रोडवर सर्व बकऱ्या बांधलेल्या होत्या. दि २०/०८/२०२१ चे २२.०० वा. ते दि २१/०८/२०२२ चे ०३.३० वा. दरम्यान अज्ञात चोराने माइया गोठयातील एक काळया रंगाचा बकरा किमती ७,०००/–रु. व काळया रंगाची बकरी कि. ५,०००/–रु. एकुण १२,०००/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार यंगलवार ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

### कोळसा चोरी करणारा आरोपी अटक

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील डब्लु.सी.एल उमरेड येथे दिनांक २१/०८/२०२२ चे ०६.३० वा. ते ०७.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– रामु शेषराव भोयर, वय ४८ वर्ष, रा. डब्ल्यु.सी.एल. उमरेड (वरिष्ठ सुरक्षा प्रहारी उमरेड ओपन कास्ट) हे आपल्या कामावरून घरी जात असतांना डस्टर वाहन क्र. एम.एच–४९/बि. २०२६ चा चालक आरोपी नामे– प्रशांत दयाराम भोसकर, वय ३२ वर्ष, रा. बुधवारीपेठ उमरेड याने उमरेड येथिल माईन्स मधुन त्याच्या ताब्यातील वाहनामध्ये २ टन कोळसा कि. अंदाजे २०,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेत असतांना मिळून आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राहुल धोडे ९२८४८७१५५७ हे करीत आहे.

## <u>अपघातात मृत्यु</u>

**<u>१) पो.स्टे. बोरी</u>** :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील टोलनाका बोरखेडी येथे दिनांक २१/०८/२२ चे १६.३० वा. ते १७.०० वा. सुमारास **सुरेन्द्र रामोजी वलके(मृतक), वय ४० वर्ष, रा. कानोली गुमगाव ता. हिगणा जि. नागपुर** हा त्याची एमएच– ४०/टी– ३१०७ क्रमांकाच्या मोटरसायकलने चुलत भाउ सोबत डब्बल सीट बोरखेडी वरून बुटीबोरी येथे जात होता. त्यादरम्यान बोरखेडी टोलनाका हायवे रोडवर आरजे– ०९/जीसी– ०३५८ क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– जगदीश लक्ष्मणसींग राजपुत, वय ३५ वर्ष, रा. धानमिल डरीयाल जि. नैनिताल उत्तरांखड याने आपले ताब्यातील वाहन उभा करून त्याचे वाहनावर कोणत्याच प्रकारचे रिफलेक्टर लावलेले नव्हते व ट्रकच्या मागे सेफ्टी कोण सुध्दा नव्हते. त्या ट्रकला मागुन मृतकाची मोटरसायकल ची धडक लागल्याने तो गंभीर रित्या जखमी झाला व मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनील रामुजी वलके, वय ४५ वर्ष, रा. कानोली गुमगाव ता.जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २८३, ३०४ अ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास श्रेणी पोउपनी मुन्नासींग ठाकुर मो. क्र. ८८८८८६२२५७ हे करीत आहे.

**<u>२) पो.स्टे. काटोल</u>** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील काटोल पारडसिंगा रोड दिग्रस फाटा काटोल येथे दिनांक २०/०७/२२ चे १५.०० वा. ते दिनांक २१/०७/२२ चे १५.३० वा. सुमारास मृतक/आरोपी नामे– किशोर अशोक वानखेडे, वय ३२ वर्ष, रा. पिंपळगाव हा त्याचे एम. एच– ४०/एच– ६३१३ क्रमांकाच्या मोटरसायकलने पिंपळगाव वरून काटोल येथे फवारणीचे औषध आणण्याकरीता जात असता काटोल ते जलालखेडा रोडजवळ मोटारसायकल ब्रेकवरून उसळल्याने तो मोटारसायकलसह खाली पडला. या अपघातात त्याचे डोक्याला गंभीर मार लागून तो मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनील रामुजी वलके वय ४५ वर्ष, रा. कानोली गुमगाव, जि नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास जवाहर चव्हाण मो. क्र. ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

## <u>पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल</u>

**<u>१) पो.स्टे. कोंढाळी</u>** – दिनांक २०/०८/२०२२ चे ०८.३० वा. चे सुमारास पो.स्टे. कोंढाळी हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन बहीन वय १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री मिनल बारंगे मो.क्र. ९५२७४७५२१७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक –** दिनांक १८/०८/२०२२ चे १६.०० वा. ते २२.०० वा. चे सुमारास पो.स्टे. रामटेक हद्दीत फिर्यादीयांची मुलगी वय १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हि मामाच्या गावाला आली होती व दुसऱ्या दिवशी गावाला परत येणार होती परंतु ती परत आली नाही. फिर्यादीने भावाच्या मुलास फोन करून विचारले असता त्याने सांगीतले की पैशे आणणे करीता रामटेकला जातो असे सांगुन ऑटोमध्ये बसुन गेली तेव्हा फिर्यादीने मुलीचा मोबाइल वर फोन केला असता तीचा मोबाइल बंद होता. तेव्हा फिर्यादीने नातेवाइकाकडे फोन लावुन चौकशी केली असता ती आली नसल्याचे सांगीतले म्हणुन फिर्यादीचा मुलीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री खोब्रगडे मो.क्र. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. वेलतुर :–** दिनांक १२/०६/२०२० ते दिनांक ०२/०२/२०२२ चे ११:०० वा. ते ०९.०० वा. चे सुमारास वय १६ वर्षीय पीडित/फिर्यादी मुलगी हि अल्पवयीन आहे हे माहित असतांना सुद्धा आरोपी नामे– १) प्रविण बिसन डहारे, वय अंदाजे २२ वर्ष, रा.रुयाड, ता.कुही, २) विलास प्रल्हाद मांढरे, वय ४६ वर्ष, रा.वेळगाव, पो.डोंगरमौदा, ता.कुही यांनी तिच्यासोबत जबरदस्तीने वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले त्यामुळे सदर पिडीत ही गरोदर आहे. आरोपीतांनी पीडितेला याबाबत घरी कुणाला काही सांगीतले तर तुला मारीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(२)(एन),३७६(३) भादंवि. सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मंडवले मो.क्र. ९७६३२३४५४८ या करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कळमेश्वर :–** दिनांक २०/०८/२०२२ चे २१.०० वा. दरम्यान वय ४६ वर्ष ही पाचवार कढई कार्यक्रमात गेली असता त्या पूजेचे कढई करीता आरोपी नामे– गिरधर आत्माराम बरगट, वय ५० वर्ष, रा. ब्राम्हणी कळमेश्वर हा हजर असतांना फिर्यादी घरात असलेल्या पूजेच्या ठिकाणी अक्षदा व फुल टाकीत असता आरोपीने फिर्यादीस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. फिर्यादीचे पतीने आरोपीस विचारपूस केली असता आरोपीने शिवीगाळ करून पाहून घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३४५, ३५४ (अ), ५०४, ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जिजकार मो.क्र. ८७६६९०१८६९ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. बुटीबोरी :–** अंतर्गत ०२ कि.मी अंतरावरील मौजा जुनीवस्ती बुटीबोरी येथे दिनांक २१/०८/२०२२ चे १६:०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रमोद बालचंद बारसागडे, वय ३५ वर्ष, रा. पिंपळगाव निपानी ता. पवनी, जि. भंडारा ह.मु. जुनीवस्ती बोरी हे कंपनीत कामावर गेले असता **सौ प्रिया प्रमाद बारसागडे(मृतक), वय २७ वर्ष, रा. पिंपळगाव निपानी ता. पवनी, जि. भंडारा ह.मु. जुनीवस्ती बोरी** ही लहान मुला मुलीसह घरी एकटे असतांना तिने अज्ञात कारणावरून राहते घराचे छताचे लोखंडी ॲगल ला दुपटयाने गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बुटीबोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनी मुन्नासिंग ठाकुर ८८८८८६२२५७ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा आष्टी येथे दि. २१/०८/२०२२ चे १६.०० वा. सुमारास **गुलाब शंकरराव तायडे (मृतक), वय ३९ वर्ष रा.आष्टी ता सावनेर ता. सावनेर जि नागपुर** हा आपले घराचे बाहेर असलेले सागवनी डेर सरळ करीत असता त्या सागवणी डेर ला बांधुन असलेला इलेक्ट्रीक वायर ला हाथ लागल्याने इलेक्ट्रीक वायर चा करंट लागुन तो खाली पडला व जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शंकरराव येळबा तायडे, वय ७४ वर्ष रा.आष्टी ता सावनेर ता. सावनेर जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार रामराव पवार मो.नं. ७८७५९८३३६० हे करीत आहे.

२) पो.स्टे. खापा :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील नविन वाकी शिवार येथे दि. २०/०८/२०२२ चे १५.०० वा. सुमारास **सौ जयश्री धमेंद्र सोनटक्के(मृतक), वय ४५ वर्ष रा.हरीहर नगर बेसा नागपूर** ही प्रापटी डिलींग चे काम करीत होती. या टेंशन मुळे तिने या आधी सुध्दा अंबाझरी तलावात उडी मारून मरण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर ती वाकी येथे येवुन कन्हान नदिचा पात्रात पाण्यामध्ये उडी घेवुन पाण्यात डुबुन मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– धमेंद्र सुरेश सोनटक्के वय ५३ वर्ष रा.हरीहर नगर, बेसा नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार प्रमोद बन्सोड मो.क्र. ९९२३४१०२२३ हे करीत आहे.

३) पो.स्टे. कुही :– अंतर्गत जिल्हा परिषद शाळे जवळाचा तलाव मौजा पाचगाव येथे दि. २१/०८/२०२२ चे ०३.०० वा. सुमारास **सुरज प्रेम अहीरवार (मृतक), वय ३१ वर्ष रा. पाचगाव** हा दारू पिण्याच्या सवयीचा असुन हा दि.२०/०८/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा. दरम्यान कामाला जातो असे सांगुन घरून गेला होता. रात्री उशिरा पर्यंत घरी परत न आल्याने त्याचा इकडे तिकडे शोध घेतला असता मिळुन आला नाही. दि. २१/०८/२२ रोजी दुपारी ०२.०० वा. दरम्यान आई कडुन माहिती झाले की, जिल्हा परिषद शाळेजवळाचा तलावामध्ये सुरज चे प्रेत आहे. त्यावरून जावुन पाहिले असता प्रेत हे फिर्यादीचा मोठा भाउ सुरज प्रेम अहीरकर याचे होते. तो नेहमी दारू पिण्याचया सवयीचा असून त्याने दारूच्या नशेत तलावाच्या पाण्यात बुडुन मरण पावला असावा.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शंकर प्रेम अहीरवार, वय २८ वर्ष, रा. पाचगाव यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार चांगदेव कुथे मो.क्र. ९७६४००७७२० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**